**राष्ट्रीय कौशल्य विकास अभियानांतर्गत “उपजिविकेसाठी कौशल्य संपादन व ज्ञान जागरूकता अभियान (The Skill Acquisition & Knowledge Awareness for Livelihood Project-SANKALP)” योजनेंतर्गत केंद्र हिश्याचा रु. ५.५४ कोटी इतका निधी वितरीत करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: कौविउ-२०१९/प्र.क्र.७०/अभियान-१,**
दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०२ नोव्हेंबर, २०२०

**संदर्भ :**

१. सह सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक B-१२०११/४८/२०१५-SDE, दिनांक १५/०९/२०१७.

२. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग/ शासन निर्णय क्र.कौविउ-२०१७/ प्र.क्र.१८७/ अभियान-१ दिनांक: ३० ऑगस्ट,२०१९

३. कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक F.No.SD-२१/५९/२०२०-IC, दिनांक २९/०७/२०२०.

४. वित्त विभाग /शासन निर्णय क्रमांक:अर्थसं-२०२०/प्र.क्र६५/अर्थ-३/ दिनांक ०४/०/०५/२०२०

५. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग/शासन निर्णय क्रमांक-२०१९/ प्र.क्र.७०/अभियान-१/दिनांक १९/१०/२०२०

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयामार्फत National Skill Development Mission अंतर्गत, सुरु करण्यात आलेल्या **“उपजिविकेसाठी कौशल्य संपादन व ज्ञान जागरूकता अभियान (The Skill Acquisition & Knowledge Awareness for Livelihood Project-SANKALP)”** अंतर्गत केंद्र हिश्याचा सर्वसाधारण घटकासाठीचा रु. ५.५४ कोटी इतका निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांना वितरीत करण्याबाबतचा शासन निर्णय सं.क्र. ५ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांना “नियंत्रण, आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात आले आहे.

तथापि, मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांना शासनाच्य ध्येय व धोरणानुसार कौशल्य विकासाशी निगडीत उपक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी“नोडल एजन्सी” म्हणून घोषित केले असल्याने, आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना या योजनेचे “नियंत्रण अधिकारी” म्हणून घोषित करणे आवश्यक आहे. त्यामुळे दिनांक १९/१०/२०२० रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत असून यासंदर्भातील सुधारित शासन निर्णय खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.

२. केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयामार्फत National Skill Development Mission अंतर्गत, देश व राज्य पातळीवर संस्थात्मक यंत्रणा मजबूत करणे, दर्जेदार प्रशिक्षकांचा समूह तयार करणे, राज्य स्तरावर राबविण्यात येणाऱ्या सर्व कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांचे केंद्रीकरण करणे, कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांचे संनियंत्रण व मूल्यमापन करण्यासाठी प्रभावी यंत्रणा निर्माण करणे, सामाजिकदृष्टया मागासवर्गासाठी कौशल्य प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, उत्पादन क्षेत्राकरिता आवश्यक कौशल्ययुक्त मनुष्यबळ निर्माण करणे तसेच मेक इन इंडीया या संकल्पनेस पूरक सहाय्य करणे, या उद्देशांसाठी **"उपजिविकेसाठी कौशल्य संपादन व ज्ञान जागरूकता अभियान (The Skill Acquisition & Knowledge Awareness for Livelihood Project-SANKALP)"** राबविण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचा कालावधी ०६ वर्षे असून, प्रकल्प खर्चातील केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा ६० : ४० या प्रमाणात असणार आहे. सदर प्रकल्प राज्यात राबविण्यास दिनांक ३०/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

३. "उपजिविकेसाठी कौशल्य संपादन व ज्ञान जागरूकता अभियान (The Skill Acquisition & Knowledge Awareness for Livelihood Project-SANKALP)" या योजनेसाठी केंद्र हिश्याचा निधी उपरोक्त संदर्भाधीन क्र. ३ येथील पत्रान्वये राज्य शासनास प्राप्त झाला असून, सदर निधीपैकी रु.५.५४ कोटी इतका निधी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना वितरित करण्याची बाब विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :**

केंद्र शासनाच्या संदर्भाधीन क्र.१ येथील पत्रान्वये, राष्ट्रीय कौशल्य विकास अभियानांतर्गत "उपजिविकेसाठी कौशल्य संपादन व ज्ञान जागरूकता अभियान (The Skill Acquisition & Knowledge Awareness for Livelihood Project-SANKALP)" या योजनेसाठी केंद्र हिश्याचा रु. २२,०४,४०,०००/- इतका निधी सन २०१८-१९ करीता खालीलप्रमाणे घटकनिहाय राज्य शासनास वितरित करण्यात आला आहे.

| Major Head - ३६०१ | |
|---|---|
| ३६०१.०६.१०१.३६.०३.३१-Grants-in-aid-General | १६,४८,८९,१२० |
| ३६०१.०६.७८९.१९.०३.३१-Grants-in-aid-General (Scheduled Caste) | ३,६५,९३,०४० |
| ३६०१.०६.७९६.१८.०३.३१-Grants-in-aid-General (Tribal Areas) | १,८९,५७,८४० |
| TOTAL | **२२,०४,४०,०००** |

२. या योजनेच्या वार्षिक आराखड्यापैकी रुपये ३६.७४ कोटींचा वार्षिक आराखडा मान्य असून, यामध्ये केंद्र हिश्श्याचा (६०%) रु. २२,०४,४०,०००/- तर राज्य हिश्याचा (४०%) रुपये १४,६९,६०,००० इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या दिनांक ०४.०५.२०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यक्रमांतर्गत योजनेसाठी ३३ टक्केची मर्यादा विचारात घेऊन या योजनेसाठी केंद्र हिश्याच्या (६० टक्के) रु. १६,४८,८९,१२०/- इतक्या निधीपैकी ,रु.५.५४ कोटी इतका निधी वितरित व खर्च करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली आहे.

३. "उपजिविकेसाठी कौशल्य संपादन व ज्ञान जागरूकता अभियान (The Skill Acquisition & Knowledge Awareness for Livelihood Project-SANKALP)" या योजनेसाठीच्या सर्वसाधारण घटकाकरीता रु.५.५४ कोटी इतका निधी आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांनी सदर निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांना खर्च करण्यासाठी वर्ग करावा. याकरीता आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना "नियंत्रक अधिकारी" तसेच सहायक संचालक (लेखा) कोकण भवन यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर निधी वितरीत व खर्च करताना आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई तसेच सहायक संचालक (लेखा) कोकण भवन यांना आहरण व संवितरण अधिकारी यांनी खालील अटी व शर्तीचे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

१) या शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्यात आलेला निधी मागणी क्र. झेडए-२, २२३० कामगार व सेवायोजन (०१) (१५)उपजिविकेसाठी कौशल्य संपादन व ज्ञान जागरूकता अभियान -संकल्प, (केंद्र हिस्सा ६० %, (सर्वसाधारण) (कार्यक्रम), (२२३० ए३८१), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात खर्ची टाकण्यात यावा.

२) केंद्र पुरस्कृत उपजिविकेसाठी कौशल्य संपादन व ज्ञान जागरूकता अभियान (The Skill Acquisition & Knowledge Awareness for Livelihood Project-SANKALP)" या योजनेसाठीचा खर्च करण्याची कार्यवाही केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार करण्यात यावी. व याबाबतचे लेखे स्वतंत्र ठेवून खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र व इतर तपशील केंद्र शासनाच्या संबधीत मंत्रालयाकडे तसेच शासनाकडे पाठविण्याची दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांनी घ्यावी. तसेच सदर लेखे महालेखापाल यांना लेखा तपासणीच्यावेळी उपलब्ध करुन देण्यात यावेत.

३) सदर निधी खर्च करताना वित्तीय अधिकार नियमांचे तसेच वित्त व नियोजन विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना/नियम/अटी/शर्ती यांचे पालन करण्यात यावे.

६. प्रस्तुत शासन निर्णय नियोजन विभाग, अनौपचारीक संदर्भ क्रमांक ९५२/१४७१, दि.१९/०८/२०२० व वित्त विभाग, अनौपचारीक संदर्भ क्रमांक १४२४/व्यय-६, दिनांक ०४/०९/२०२० अन्वये प्राप्त झालेल्या अधिकार/ सहमतीन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२०११०३१११८२५३९०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Vithal Rokade

Digitally signed by Santosh Vithal Rokade
DN: c=IN, o=Skill Development and Entrepreneurship Department, Government Of Maharashtra, ou=eOffice, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ca5751ffedbb005fdff34ab6ac1f8319d061483d7d35e20f744e251360f7920a, serialNumber=ecf4a9abe84c70de989c3669424c12b6cadcb583d500fe489ce8727916e0bbee, cn=Santosh Vithal Rokade
Date: 2020.11.03 11:20:06 +05'30'

**( संतोष रोकडे )**
अवर सचिव, महाराष्ट्र राज्य

**प्रत :-**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. सर्व मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
६. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य

७. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
८. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, मुंबई.
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
११. सहायक संचालक (लेखा), कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, मुंबई.
१२. कोषागार कार्यालय, मुंबई/नवी मुंबई.
१३. महालेखापाल कार्यालय, मुंबई/नागपूर.
१४. सह सचिव/उप सचिव/अवर सचिव कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय मुंबई.
१५. सर्व कार्यासने, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवड नस्ती (अभियान-१).